Astro • Puja • Vastu

|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## दुर्गे दुर्घट भारी

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारी वारीं जन्ममरणाते वारी । हारी पडलो आता संकट नीवारी ॥ १ ॥

जय देवी जय देवी जय महिषासुरमथनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ धृ. ॥

त्रिभुवनी भुवनी पाहतां तुज ऐसे नाही । चारी श्रमले परंतु न बोलावे काहीं ॥
साही विवाद करितां पडिले प्रवाही । ते तूं भक्तालागी पावसि लवलाही ॥ २ ॥ जय देवी... जय देवी...

प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां । क्लेशापासूनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥ जय देवी... जय देवी...

### साडेतीन शक्तिपीठाची आरती

जय रामा जय भवानी कृपाळुयंत परशुरामाची मार्त आरती ओवाळु
मनोभावे ओवाळु मूळ माया रेणुके आनंदी जय देवी जयदेवी ॥ धृ ॥

चतुःश्रृंगी डोंगर बरूनी सत्यानंदांतो वरूनी सत्यानंदांतो त्रिगुन तिन्ही ताळ  माहा तिन्ही ताळ आईच्या चरणी
खेळतो चंड मुंड मर्दैन महिषासुर  यद्याया जातोघालून पायास्थळी घालून चरणास्थळी केला
आपला राहीवास आनंदि जय देवी जयदेवी ||1||

शिनगार पिवळा उभी रावळा द्वारी उभी देवळा द्वारी जय जय कार होतो आनंदकार होतो अवघ्या माहुर पूरी पंच तत्त्वाहुन
देवी तुझी गाउ आरती आई तुझी गाउ आरती दोन्ही हात जोडूनि आई च्या लाघु चरणी आनंदी जय देवी जयदेवी ||2||

शेवाळ तळ तिथ अंबेच ठाण मूळ मायेच ठाण तिथ नांदले ऋषि मल्हार मार्तण्डराव अवधूत राव चरणी मागतो ठाय
पाहिल मूळ पीठ देखील मूळ पीठ आईया हरला शिनभाग आनंदी जय देवी जयदेवी ||3||

घाटशीळा वर अंबिका उभी राहाशि भवानी उभी राहाशि शिळेवर राहुन वाट भक्तांची पाहाशि लेकर बाळ आईच्या
समोरा येती तुकाई समोरा येती उचलून कडेवर घेऊन आपल्या रावळा जाशी आनंदी जय देवी जयदेवी ||4||

पायानी पोल्हाळ यावया वाजे खुळखुळ टीपरयांचां झल्लाळ मोह माया यल्लाळ अगाद तुझी करनी अंबे देखिला डोळा,
भवानी देखीला डोळा ल्पाली सर्व लेन आईच्या हार शोभे गाळा आनंदी जय देवी जयदेवी ||5||

कळा कळा कळा कळा चंद्राच्या शोभती कळा सूर्याच्या शोभती आनंदराव दिवट्या परसराम
दिवट्या अभिजीत गातो आरती आनंदी जय देवी जयदेवी

(३) कपाराची ज्योत  कापराची ज्योत अंबे ओवाळु तुजला | भवानी ओवाळु तुजला देहंभावे अहंकार ..
( २ )  चरणी वाहीला || सप्तशतीच्या पाठे अंबे कृपा मज केली रेणुके कृपा मज केली
भक्तावर द्या या  -२ अंबा प्रसन्न झाली || १ ||

दया क्षमा शांती अंबे उजळल्या ज्योती । रेणुके उजळल्या ज्योती  स्वंय प्रकाशीत पहिली अंबेची मुर्ती ।।
आनंदाने भावे कापुर आरती केली  रेणुके आरती केली भक्ती भावे सेवा - प्रेमभावे सेवा
आईच्या चरणी वाहिली || २ ||

### महालक्ष्मी | देवीची आरती

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ ।।
करवीरपुरवासिनी सुरवरमुनिमाता । पुरहरवरदायिनी मुरहरप्रियकांता ।
कमलाकारें जठरी जन्मविला धाता । सहस्रवदनीं भूधर न पुरे गुण गातां ।।१ ।।
जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ ।।

मातुलिंग गदा खेटक रविकिरणीं । झळके हाटकवाटी पीयूषरसपाणी ।
माणिकसरना सुरंगवसना मृगनयनीं । शशिधरवदना राजस मदनाची जननी ।।२ ।।
जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ ।।

तारा शक्ति अगम्या शिवभजकां गौरी । सांख्य म्हणती प्रकृति निर्गुण निर्धारीं ।
गायत्री निजबीजा निगमागम सारी । प्रगटे पद्मावती निजधर्माचारी || ३ ||
जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ ।।

अमृत भरिते सरिते अघदुरिते वारी | मारी दुर्घट असुरां भव दुस्तर तारीं ।
वारी मायापटल प्रणमत परिवारी | हे रुप चिद्रुप तद्रुप दावी निर्धारी ।।४ ।।
जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ ।।

चतुराननें कुश्चितकर्माच्या ओळी । लिहिल्या असतील माते माझे निजभाळीं ।
पुसोनि चरणांतळी पदसुमनें क्षाळी । मुक्तेश्वर नागर क्षीरसागरबाळी ।।५ ।।
जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ ।।

### भवानी आरती

जय जय भवानी, मनरमणी, मातापुरवासिनी | चवदा भुवनांची स्वामिनी, महिषासुरमर्दिनी |
जय जय भवानी ॥ धृ ॥

नेसूनि पाटाऊ, पिवळा हार शोभती गळा | हाती घेऊनिया त्रिशूळा भाळी कुंकुम टिळा ॥
जय जय भवानी ॥ १ ॥

अंगी लेवूनिया काचोळी, वर मोत्याची जाळी | हृदयी शोभतसे, पदकमळी कंठी हे गरसोळी ॥
जय जय भवानी ॥ २ ॥

पायी घागरिया, घूळघूळ नाकी मुक्ताफळ | माथा केश हे कुरळ, नयनीही काजळ ॥
जय जय भवानी ॥ ३ ॥

सिंहावरी तू बैसून मारिसी दानवगण | तुजला विनविती, निशिदिन गोसाविनंदन ॥
जय जय भवानी ॥ ४ ॥

HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

SANPADA OFFICE
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

GOVANDI OFFICE
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com